स्वीय सहायक, गट-ब राजपत्रित या संवर्गात तात्पुरती नियमित पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क विभाग,

शासन आदेश क्र. मावज-२०२५/२४३ /प्र.क्र. ७८/मावज-२

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

दिनांक : १८ ऑगस्ट, २०२६

आदेश

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क (वेतनश्रेणी एस-१६ : ४४९००-१४२४००) संवर्गात कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्याला स्वीय सहायक, गट-ब राजपत्रित (वेतनश्रेणी एस-१७ : ४७६००-१५११००) या पदावर खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरती नियमित पदोन्नती देण्यात येत असून त्यांची रकाना ४ येथे त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	प्रवर्ग	पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४
	श्रीमती स्मिता परमेश्वर ठाकरे	अजा	स्वीय सहायक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

अटी व शर्ती :-

१) वरील अधिकाऱ्याला स्वीय सहायक, गट-ब या पदावरील पदोन्नती ही मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निकालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती ही निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) निवडसूची तयार करताना कोणीही ज्येष्ठ अधिकारी अनावधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत.

४) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच, दि. ७ मे, २०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर सहमती दर्शविण्यात येत आहे.

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६०८१८१४३९०५९१३८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by AJAY DHONDBARAO BHOSALE
Date: 2026.08.18 14:39:56 +05'30'

(अजय धों. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (मा.व ज.), माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व परिक्षा), मुंबई / नागपूर,
५. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
९. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१०. संबंधित अधिकारी (मा.व ज. मार्फत),
११. निवडनस्ती.